| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १६/०५/२०११ | | |
| नोंदणी तारीख | : | १६/०५/२०११ | | |
| निकाल तारीख | : | ०९/०९/२०२१ | | |
| कालावधी | : | वर्षे १० | महीने ३ | दिवस २३ |

**नाशिकरोड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (मोटार वाहन) यांचे न्यायालयात**

( पिठासन अधिकारी दीपक दा. कर्वे )

**नियमीत फौजदारी खटला क्र.१९७/२०११** **निशाणी क्र.९०**
**सीएनआर : MHNS060082112011**

महाराष्ट्र सरकार,
द्वारा पोलीस निरीक्षक,
नासिकरोड पोलीस ठाणे,
नाशिकरोड, नाशिक. } **... अभियोग पक्ष**

**विरूध्द**

१) अजय विजय गांगुर्डे
वय : २७ वर्षे

२) मंदार यशवंत मोहिती
वय : २४ वर्षे

३) बिपीन दिपक मोहिते
वय : २१ वर्षे
सर्व राहणार : गोरेवाडी, हिवाळेवाडी,
नाशिकरोड.
**(खटला आरोपी क.३ पुरताच चालविण्यात आला आहे.)** } **... आरोपी**

**भा.दं.वि. कलम ३२६, ३२३, ५०४ सह कलम ३४ आणि मुंबई पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा..**

*********************************************************

सरकारी पक्षातर्फे सहाय्यक अभियोक्ता : **श्रीमती एस.ए.गोखले**
आरोपी क्र.१ ते ३ तर्फे वकील : **श्री. ए. सी. प्रधान**

*********************************************************

(दी.दा.कर्वे)
न्यायदंडाधिकारी (मो.वा.न्यायालय)
नाशिकरोड.

## न्या य नि र्ण य

( निकाल तारीख ०९/०९/२०२१ )

१. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२३, ५०४ सह कलम ३४ आणि मुंबई पोलीस कायदा कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरीता प्रस्तुतचा खटला दाखल करण्यात आलेला आहे.

२. अभियोग पक्षाच्या कथनानुसार दिनांक २५/०१/२०११ रोजी अरिंगळ मळा, एकलहरा रोड, नासिकरोड येथे रात्री ०८.०० वाजेच्या सुमारास पप्पू अरिंगळे यांचे वाढदिवसानिमित्त हार्दीक शुभेच्छांचा बॅनर लावित असतांना तेथे आरोपी क्र.१ ते ३ आले व तक्रारदाराचा मित्र राहूल संसारे याचेबरोबर चेष्टामस्करी करू लागले असता त्यांचे एकमेकांत किरकोळ भांडण झाले. सदरचे भांडण सोडविण्यास तक्रारदार गेला असता त्यांचा आरोपी क्र.१ ते ३ यांना राग आला व त्यांनी तक्रारदारास शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ यांनी त्यांचे हातातील लोखंडी गजाने धारदार हत्याराने तक्रारदाराच्या डोक्यावर व डावे हाताचे बोटाने जोराने मारून गंभीर दुखापत केली. त्यानंतर आरोपी पळून गेले. तक्रारदार बेशुध्द पडला असता त्याला बिटको हॉस्पीटल येथे व त्यानंतर सूजाता बिरला हॉस्पीटल, नासिकरोड येथे उपचारासाठी दाखल केले. त्यामुळे तक्रारदाराने नासिकरोड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली.

३. नासिकरोड पोलीस ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्र.३६/२०११ ची नोंद केली. पुढील तपास स.पो.नि. श्री.वाघ यांचेकडे देण्यात आला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब व पुरवणी जबाब घेतले. तक्रारदाराचे न्यायवैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक केली. त्यानंतर आरोपींविरूध्द पुरावा मिळुन आल्याने यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपी क्र.१ वेळोवेळी गैरहजर राहिल्याने अर्ज निशाणी ३० वर आदेश करून आरोपी क्र.२ व ३ चा खटला आरोपी क्र.१ पासून वेगळा करण्यात आला. त्यानंतर माझे पुर्व न्यायीक अधिकारी यांनी आरोपी क्र.२ व ३ विरुध्द दोषारोप (निशाणी क्र.३२) निश्चित केला. दोषारोप आरोपी क्र.२ व ३ यांना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपी क्र.२ व ३ यांनी गुन्हा नाकबूल करुन खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शवुन संपरिक्षा करण्यात यावी अशी मागणी

(दी.दा.कर्वे)
न्यायदंडाधिकारी (मो.वा.न्यायालय)
नाशिकरोड.

केली. त्यानंतर आरोपी क्र.२ वेळोवेळी गैरहजर राहिल्याने अर्ज निशाणी ७२ वर आदेश करून आरोपी क्र.३ चा खटला आरोपी क्र.२ पासून वेगळा करण्यात आला. खटला आरोपी क्र.३ विरूध्द पुढे चालू ठेवण्यात आला.

५. आरोपी क्र.३ वरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने **साक्षीदार क्र.1** बापू पांडुरंग सोनवणे (निशाणी क्र.४२) याला तपासले आहे. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून **तक्रारीवरील त्याची सही** (निशाणी क्र.८७), **घटनास्थळ पंचनामा** (निशाणी क्र.८८) व **मालमत्ता शोध व जप्ती पंचनामा** (निशाणी क्र.८९) वर दाखल करण्यात आले आहे.

६. आज रोजी निशाणी १ वर आदेश करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

७. आरोपी क्र.३ विरूध्द कोणताही पुरावा मिळून न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

८. अभियोग पक्षाच्या कथनावरुन तसेच प्रकरणातील सादर साक्षीपुराव्यावरुन खालील मुद्दे माझ्या निर्णीतीकरीता उपस्थित होतात. त्याचे निष्कर्ष मी खालील दिलेल्या कारणमिमांसेस अनुसरुन नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. २५/०१/२०११ रोजी रात्री ०८.०० वाजेच्या सुमारास, तक्रारदाराच्या घराजवळ, अरिंगळ मळा, एकलहरा रोड, नासिकरोड येथे आरोपी क्र.३ ने आरोपी क्र.१ व २ यांचे संगनमताने तक्रारदार बापूला गंभीर दुखापत केली ? | नाही |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमुद तारखेस, वेळी, ठिकाणी व वर नमूद आरोपींनी वर नमूद तक्रारदारास ईजा पोहचविली ? | नाही |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमुद तारखेस, वेळी, ठिकाणी व वर नमूद आरोपींनी वर नमूद तक्रारदारास सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा तसा भंग करण्याकरता | नाही |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | शिवीगाळ करून प्रवृत्त केले ? | |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमुद तारखेस, वेळी, ठिकाणी व वर नमदू आरोपींनी लोखंडी दांडा व अणूकूचीदार भाग असलेले शस्त्र वापरून नासिक शहराच्या पोलीस आयुक्त यांच्या आदेशाचे उल्लंघन केले ? | नाही |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

९. विद्वान सहाय्यक अभियोगपक्षाचे वकील आणि आरोपी क्र.३ तर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

### मुद्दा क्र. १ ते ५ करीता :-

१०. तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी मुद्दा क्र.१ ते ५ एकत्र चर्चिले आहेत व त्यांचे निष्कर्ष एकत्रित नोंदवित आहे.

११. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१ म्हणजेच तक्रारदार बापू याने त्याच्या सरतपासात (निशाणी क्र.८६) तो आरोपीला ओळखत नसल्याचे, तसेच घटना कधी घडली हे त्याला सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. तक्रारीवरील त्याची सही त्याने ओळखली आहे. मात्र इतर मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे. न्यायालयाच्या पुर्वपरवानगीने अभियोगपक्षाच्या वकीलांनी अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ बापू यांना सुचनात्मक प्रश्न विचारले. मात्र अभियोग पक्षाला मदत होईल अशी कोणतीही कबूली त्याच्याकडून मिळविण्यात अभियोगपक्षाच्या वकीलांना अपयश आलेले आहे.

१२. आरोपीतर्फे वकीलांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी ८८) व अभियोगपक्षाचा साक्षीदार क्र.१ बापू याच्याकडून जप्त केलेल्या रक्ताचे डाग असलेला शर्ट, एक बाहीचे बनियन व एक फुल पँट याचा मालमत्ता शोध व जप्तीचा पंचनामा (निशाणी ८९) मान्य केले आहे. मात्र

एवढयावरूनच आरोपी क्र.३ नेच गुन्हा केलेला आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही.

१३. अभियोगपक्षाची साक्षीदार क्र.१ बापू व आरोपी क्र.३ यांचेत समजोता झाल्याबाबत अर्ज (निशाणी ८४) व पुरसिस (निशाणी ८५) अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहे. मात्र तेवढयावरूनही आरोपी क्र.३नेच गुन्हा केलेला आहे व त्याच्या परिमार्जन करण्याकरता त्यांनी समजोता केला असा निष्कर्ष काढता येणार नाही.

१४. अभिलेखावरील दाखल पुराव्यावरून आरोपी क्र.३ ने गुन्हा केलेला आहे ही बाब सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी क्र.३ निर्दोष म्हणून मुक्त होण्यास पात्र आहेत या निष्कर्षाप्रत मी येत आहे.

१५. तक्रारदार व आरोपी क्र.३ यांच्यात समजोता झाल्याचे दिसून येत आहे. सबब खोटी साक्ष दिल्याबाबत तक्रारदाराविरूध्द कारवाई करणे न्यायोचित ठरणार नाही.

१६. वरील सर्व विवेचनावरून मी **मुददा क्र.१ ते ४ चा** निष्कर्ष '**नाही**' असा देत आहे व मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -: आ दे श :-

१. **आरोपी क्र.३ बिपीन दिपक मोहिती** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२३, ५०४ सह कलम ३४ आणि मुंबई पोलीस कायदा कलम १३५ शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.३ यांचे बंधपत्र व जामीनकतबा रदद् करण्यात येत आहे.

३. फौजदारी व्यवहार संहिता कलम ४३७-अ ची पुर्तता म्हणुन आरोपी क्र.३ यांनी रु.५,०००/- इतक्या रकमेचे वैयक्तिक बंधपत्र व एक जामीन देण्याचा आहे.

४. खटला आरोपी क्र.१ व २ करिता पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

(दी.दा.कर्वे)
न्यायदंडाधिकारी (मो.वा.न्यायालय)
नाशिकरोड.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.

( दीपक दा. कर्वे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
मोटार वाहन न्यायालय, नाशिकरोड.

ठिकाण :- नाशिकरोड.
दिनांक :- ०९/०९/२०२१

**CERTIFICATE**

This is to certify that the contents of PDF order are same to same as per the original Judgment.

Court Name :- Civil Judge,J.D.,Satana.

Date of Decision : 09/09/2021

Date of Signature : 09/09/2021

Uploaded within 3 days of working days.